# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक : - १० डिसें २०२४

---

जळगाव दि.१० (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या वतीने कुलपती घनवन योजना मियावाकी या उपक्रमासाठी दोन महाविद्यालयांनी दत्तक घेतलेल्या तीन गावांची निवड करण्यात आली असून विद्यापीठाच्यावतीने या योजनेसाठी या महाविद्यालयांना प्रत्येकी ५० हजार रुपये अनुदान दिले जाणार आहे.

जपान येथील वनस्पती आणि पर्यावरण शास्त्रज्ञ अकिरा मियावाकी यांच्या नावावर आधारित असलेली मियावाकी घनवन पध्दत प्रभावी कार्बनसिंग तयार करणे आणि वेगाने नष्ट होत असलेल्या जैवविविधतेला अधिवास देते हे सिध्द झाले आहे. विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्यावतीने पुढील पाच वर्षात विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ७५ महाविद्यालयांमध्ये ही योजना राबविली जाणार असून त्यासाठी या वर्षी पारोळा येथील राणी लक्ष्मीबाई महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या दोन गावांमध्ये आणि फैजपूरच्या धनाजी नाना महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या एका गावामध्ये ही योजना राबविली जाणार आहे. या योजनेमुळे भारतीय प्रजातीच्या वनस्पती तसेच परिसरातील वातावरण शुध्द राहील. पक्षी प्राण्यांमुळे नैसर्गिक संसाधन तयार होऊन पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही. त्यामुळे हा महत्वाकांक्षी प्रकल्प विद्यापीठाने राबविण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे यांनी दिली. ज्या महाविद्यालयांना ही योजना राबवायची असेल त्यांनी रासेयोचे संचालक डॉ.सचिन नांद्रे यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## बातमी क्र.२

जळगाव दि.१० (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे प्रशाळेत जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त रोशन मावळे यांचे व्याख्यान झाले.

श्री.मावळे यांनी मानवी हक्क दिन तसेच संयुक्त राष्ट्रसंघांची भूमिका विशद केली. अध्यक्षस्थानी रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे होते. यावेळी डॉ.मनोज इंगोले, डॉ. कविता पाटील, डॉ. दिगंबर सावंत, डॉ. सुषमा तिनगोटे, डॉ.अभय मनसरे, प्रा.वर्षा पालखे, अतुल पाटील, प्रा.मोईन शेख, प्रा. नेहा पाटील, तथागत सुरवाडे यांची उपस्थिती होती. डॉ. विजय घोरपडे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. योगेश माळी यांनी आभार मानले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

**आपला विश्वासू**

**जनसंपर्क अधिकारी**